**उलटमतपास ॲड. श्री खंडारे अर्जदारातर्फे :—**

१५. हे म्हणने खरे आहे की तक्रारदाराने दिनांक ३१.०५.२०१८ रोजीचा त्याला सेवतून कमी केल्याचा आदेश हा महाराष्ट प्रशासकीय लवाद यांचे समक्ष आव्हानीत केले होते. हे म्हणने खरे आहे की प्रशासकीय लवादाने दिलेला आदेश तक्रारदाराने मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे आव्हानीत केला होता. हे म्हणने खरे आहे की मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर ने तक्रारदाराने दाखल केलेली याचीका ही निकाली काढून तक्रारदाराला कामगार न्यायालयात अर्ज दाखल करण्याची मुभा दिली आहे. हे म्हणने खरे नाही की तक्रारदाराने दाखल केलेली प्रस्तूत तक्रार ही विहीत मुदतीत दाखल केलेली आहे.

१६. हे म्हणने खरे नाही की तक्रारदाराने गैाअर्जदार यांचेकडे सन १९९९ ते २०१८ या कालावधीत सलग सेवा दिलेली आहे. हे म्हणने खरे नाही की तक्रारदार हा गैअर्जदार यांचे कडे लॅब असीसटंट म्हणून रोजंदारीवर काम करीत होता. हे म्हणने खरे आहे की तक्रारदाराने औद्योगिक न्यायालय, चंद्रपूर येथे तक्रार कं. ८०/२००९ ही परमनन्सी बेनेफीट मीळण्याकरीता दाखल केली होती व ती तक्रार औद्योगिक न्यायालयाने नाकारली होती. हे म्हणने खरे आहे की त्या विरुध्द तक्रारदाराने रिट पीटीशन क्र. १८७५/२०१९ दाखल केली होती व ती सुध्दा मा. उच्च न्यायालयाने निकाली काढून तक्रारदाराला

कामगार न्यायालयात परमनन्सी बेनेफीट मागण्यासाठीची मुभा दिलेली आहे.

१७. तक्रारदाराला त्याची रोजंदारी ही बांधकाम विभागाने अकुशल कामगारांकरीता रोजंदारीचे जे नियम आहे त्यानुसार तक्रारदाराला रोजंदारी देण्यात आलेली आहे. तक्रारदाराला दिलेली नुकसान भरापाईची रक्कम रुपये ९३,५५५/— ही त्याने केलेल्या कामाची हजेरी विचारात घेवून त्याला देण्यात आलेले आहे. हे म्हणने खरे नाही की तक्रारदाराला नुकसान भरापाईची रक्क्म ही दिनांक २०.०४.२०१८ रोजीची बांधकाम विभागचे शासन निर्णयाप्रमाणे ३३०/— रुपये रोजंदारी गृहीत धरुन दयायला पाहीजी होती. साक्षदार स्वत: सांगतो की गैरअर्जदारचे वीत्तीय शाखेकडे त्यावेळी उपलबध असलेल्या बांधकाम विभागाचे शासन निर्णयाप्रमाणे २९७/— रुपये रोजंदारी पकडून त्याला नुकसान भरपाईची रक्कम दिलेली आहे.

१८. *हे म्हणने* खरे आहे की सध्या गैरअर्जदार यांचेकडे लॅब असीसटंटची परमनन्ट पोस्ट आहे. हे म्हणने खरे नाही की तक्रारदाराला लॅब असीसटंटची कायम पोस्ट असताना सुध्दा त्याला कामावरुन बेकायदेशीर रीत्या कमी करण्यात आले. साक्षदार स्वत: सांगतो की तक्रारदार हा लॅब अससीटंट नसल्यामुळे त्याचा सदर पदाशी संबध येत नाही. हे म्हणने खरे नाही की गैरअर्जदाराने तक्रारदाराला नियमाप्रमाणे नुकसान भरपाईची रक्क्म दिलेली नाही त्यामुळे गैरअर्जदाराने औधागिक वाद अधिनियम कलम २५एफ,

२५सी आणी २५ जी चे उल्लंघन केलेले आहे. हे म्हणने खरे नाही की तक्रारदाराला ज्यावेळी कामावरुन कमी करण्यात आले त्यावेळी तक्रारदाराला कनिष्ठ असलेल्या लोकाना कामावर ठेवण्यात आले होते. हे म्हणने खरे नाही की तक्रारदाराला बेकायदेशीर रीत्या कामावरुन कमी करण्यात आलेले आहे. हे म्हणने खरे नाही मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.**

**फेरतपास काही नाही**.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. १७.०१.२०२६.